ePaper
वर्ष - 7 । अंक -26 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दि. 22 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## राहुल गांधींना देशाचं पंतप्रधान करायचं आहे: नाना पटोले



### आतील पानांत

- परवानगीविना उभारले होर्डिंग!
- लोणावळा : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर
- वारकऱ्यांना सुविधा मिळणार!

## निवडणूक पार पडेपर्यंत आ. महेश लांडगेच राहणार भाजपचे जिल्हाध्यक्ष

# आ. लांडगेंना डबल लॉटरी!

### » नड्डांच्या राज्य दौऱ्यामुळे भाजपचे जिल्हाध्यक्ष नेमण्याची डेडलाईन हुकली

**। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भाजपची जंबो राज्य कार्यकारिणी ५ मे रोजी जाहीर झाल्यानंतर राज्यातील जिल्हाध्यक्ष १५ मे व नंतर २० मे पर्यंत जाहीर होतील, असे सांगण्यात आले होते. पण, भाजपचे अध्यक्ष जे.पी.नड्डा यांचा महाराष्ट्र दौरा आणि त्यासाठी तयारीच्या बैठकांचे सत्र यामुळे जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्यांची डेडलाईन हुकली आहे. पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पिंपरी-चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष जाहीर होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेची आगामी निवडणूक विचारात घेऊन ही निवड केली जाणार आहे. हा क्रायटेरिया लक्षात घेता विद्यमान शहराध्यक्ष आणि भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनाच ही निवडणूक पार पडेपर्यंत कायम ठेवले जाण्याची शक्यता आहे. तसा सूरही शहर पक्षात दिसून आला आहे. दुसरीकडे आमदार लांडगे यांचे नाव बहूधा याच महिन्याच्या शेवटी होणाऱ्या राज्य मंत्रीमंडळाच्या विस्तारातही घेतले जात आहे.**

त्यातून उद्योगनगरीला पहिल्यांदाच मंत्रीपद मिळणार आहे. ते आमदार लांडगेंना मिळाले, तर त्यांना डबल लॉटरी लागणार आहे. जिल्हाध्यक्ष निवडीपूर्वी त्या-त्या जिल्ह्यात पक्ष निरीक्षक जाऊन



तेतील पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी अध्यक्ष निवडीबाबत चर्चा करतील, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रदेश कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर सांगितले होते.

आमदार लांडगेंना मंत्रीपद मिळाले तर त्यानिमित्ताने पिंपरी-चिंचवडला ते प्रथमच मिळणार आहे. गत टर्ममध्ये त्यांना हुलकावणी दिली होती. ते मावळला मिळाले होते. यावेळी, मात्र पिंपरी-चिंचवड महापालिकेतील सत्ता टिकवून जिल्ह्यातील मावळ, खेड, शिरुर, मंचर, हवेली, आंबेगाव, मुळशी तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाला बळ देण्याकरिता भाजप आमदार लांडगेंना मंत्रिपद मग भले ते राज्यमंत्री का असेना देण्याची शक्यता आहे. त्यातून पिंपरी-चिंचवड या अजित पवारांच्या बालेकिल्ल्यात त्यांना शह देण्याची खेळीही भाजप खेळणार आहे.

शहरातील तिन्ही आमदार करण्यासाठी त्यांची मदत त्यांना होणार आहे. सध्या शहरातील तीनपैकी दोन आमदार (चिंचवडला लक्ष्मण जगताप) भाजपचे, तर पिंपरीत राष्ट्रवादीचे अण्णा बनसोडे आहेत. सध्या राष्ट्रवादीचे खासदार असलेल्या शिरूरला २०२४ ला पक्षाचा खासदार करण्याची तयारी भाजपने आतापासून सुरु केली आहे. त्याकरिताही या मतदारसंघात मोडणाऱ्या भोसरीला मंत्रिपद देणे पथ्यावर पडणारे आहे, हे हेरून भोसरीला मंत्रीपद दिले जाऊ शकते.

### बावनकुळे-फणवीस करणार निवड

» भाजपेच पिंपरी-चिंचवड निरीक्षक आणि प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी नुकताच पिंपरी-चिंचवडचा दौरा केला. त्यात त्यांनी पक्षाचे शहर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या शहराध्यक्ष निवडीबाबतच्या भावना जाणून घेतल्या. हा आढावा अहवाल प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना सादर करणार असल्याचे त्यांनी आज सांगितले. बावनकुळे आणि देवेंद्र फडणवीस हे दोघे मिळून पिंपरी-चिंचवडच्या शहराध्यक्षांची निवड करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

## पीएमपीएलच्या निगडी बस स्थानकावरील रस्त्याच्या कामामुळे प्रवाशांचा खोळंबा

### » दोन महिन्यांपासून हे काम सुरुः रिक्षाही बस स्थानकावर येऊन प्रवासी भरतात

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

पीएमपीएलच्या निगडी येथील पवळे उड्डाणपुलाखाली असलेल्या बस स्थानकावर रस्त्याचे काम सुरु असल्याने प्रवाशांना थांबण्यासाठी अडचणी येत आहे. मागील दोन महिन्यांपासून हे काम सुरु असल्याने प्रवाशांची मोठी तारांबळ उडत आहे. त्यातच रिक्षाही बस स्थानकावर येऊन प्रवासी भरतात. यामुळे देखील अपघाताची शक्यता निर्माण होत आहे.

निगडी येथील पवळेब्रिज थांब्यावर सकाळ , सायकाळच्या दरम्यान नोकदार, चाकरमान्यांची



मोठी गर्दी होते. निगडी बस थांब्याचे काम सुरु असल्यामुळे नागरिकांना याचा त्रास होत आहे. निगडी हा बसथांबा रस्त्यावर असल्यामुळे दररोज या बसस्थानकावर वाहनांची वर्दळ सुरु असते. रिक्षाचालक बसस्थांकाच्या समोर रिक्षा उभी करत असल्यामुळे पीएमपीएलच्या कर्मचाऱ्यांकडून सांगून देखील रिक्षाचालक दुलर्क्ष करतात.

### प्रवाशांनां अपघाताची भीती


» निगडी थांब्यावर वेगात वाहने येतात. अनेक नागरिक दुचाकी, चारचाकी वाहने पार्क करुन जातात. मात्र बसथांब्याचे काम सुरु असल्याने प्रवाशांना थांबण्यास जागा मिळत नसल्यामुळे प्रवासी ज्या ठिकाणी जागा मिळेल त्या ठिकाणी उभे राहताना दिसत आहेत. अशा वेळी दुचाकी चारचाकी चालक, रिक्षाचालक मध्ये वाहन घेऊन येतात. त्यामुळे प्रवाशांचा अपघात होऊ शकतो.

# परवानगीविना उभारले होर्डिंग!

## पुण्यात होर्डिंग मालकांना नोटिसा देण्याची जिल्हा परिषदेची कारवाई सुरू

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यासह रावेत येथे झालेल्या होर्डिंगच्या दुर्घटनेनंतर, पुणे जिल्ह्यात विविध तालुक्यांत १,४४० एवढे होर्डिंग उभारले असले, तरी त्यापैकी १,३७० होर्डिंग विनापरवानगी असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. त्यात १,२३० होर्डिंगचे 'स्ट्रक्चरल ऑडिट' झाले नाही. सुमारे एक हजार होर्डिंग विनापरवाना उभारल्याने त्यांच्या मालकांना नोटिसा देण्याची कारवाई जिल्हा परिषदेने केली आहे. पुण्यात बेकायदेशिर होर्डिंगच्या मालकांना जिल्हा परिषदेने नोटिसा देण्याची कारवाई सुरू केली आहे. जिल्ह्यातील विनापरवाना उभारलेल्या एकूण १,३७० होर्डिंगपैकी सुमारे एक हजार होर्डिंगच्या मालकांना नोटिसा देण्याची कारवाई केली आहे.**




ग्रामीण भागात परवाना घेतलेल्या सर्व होर्डिंगचे 'स्ट्रक्चरल ऑडिट' करण्यासह ऑडिट न झालेल्या होर्डिंग मालकास नोटीस देऊन होर्डिंग तत्काळ काढून टाकण्याची; तसेच सर्व अनधिकृत होर्डिंगवर कारवाईचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी दिले होते. धोकादायक, वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या होर्डिंगवर तातडीने कारवाई करण्याची सूचना जिल्हा परिषदेसह तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिली होती. त्या पार्श्वभूमीवर गटविकास अधिकाऱ्यांसह तहसिलदारांनी जिल्हा परिषदेला कारवाईचा अहवाल दिला आहे. हा अहवाल जिल्हा प्रशासनाकडे पाठवण्यात येणार आहे.

### 27 होर्डिंगनाच परवानगी



पुणे जिल्ह्यात १३ तालुक्यांतील ग्रामपंचायत क्षेत्रातील एकूण १,४४० होर्डिंग आहेत. जिल्ह्यात केवळ २७ होर्डिंग परवानगी घेऊन उभारण्यात आले आहेत. १,३७० होर्डिंग आता विनापरवानगी उभारले असून, आतापर्यंत २३ होर्डिंगचे 'स्ट्रक्चरल ऑडिट' झाले आहे. जिल्ह्यात उभारलेल्या होर्डिंगपैकी १,२३० होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट केलेले नाही, अशी माहिती जिल्हा परिषदेला मिळालेल्या अहवालात देण्यात आली आहे. जिल्ह्यात उभारलेल्या एकूण होर्डिंगपैकी ८७ होर्डिंग धोकादायक असल्याचे समोर आले आहे. कारवाईच्या भीतीने २७ होर्डिंग काढून टाकण्यात आले आहेत.

### होर्डिंगवर कारवाई काय?

**» जिल्ह्यातील विनापरवाना उभारलेल्या एकूण १,३७० होर्डिंगपैकी सुमारे एक हजार होर्डिंगच्या मालकांना नोटिसा देण्याची कारवाई केली आहे.**

**» 'स्ट्रक्चरल ऑडिट' न झालेल्या ८२५; तसेच धोकादायक असलेल्या ४१ होर्डिंगच्या मालकांनाही नोटिसा देण्याची कारवाई प्रशासनाने केली आहे.**

### 'तात्पुरत्या होर्डिंगची यादी तयार'

**» याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद म्हणाले, 'पुणे जिल्ह्यात होर्डिंगच्या 'स्ट्रक्चरल ऑडिट'बाबत तपासणी मोहीम राबवली होती. त्यावर कायमस्वरूपी होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले आहे, की नाही, याची विचारणा करण्यात आली. तात्पुरत्या स्वरूपात लावण्यात येणाऱ्या होर्डिंगची यादी जिल्हा परिषदेने तयार केली आहे. मान्सूनपूर्व तयारी सुरू केली असून, त्यात धोकादायक होर्डिंग काढण्याच्या सूचना दिल्या आहेत. जिल्हा परिषदेने याबाबत धोरणाचे परिपत्रक काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यात होर्डिंगची नियमावली, ग्रामपंचायतीच्या जबाबदारी यांसारख्या विविध गोष्टींची रूपरेषा परिपत्रकात असणार आहे.**

" पुणे जिल्हा परिषदेने होर्डिंगबाबत धोरण राबवण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत अभ्यास झाला असून, लवकरच परिपत्रक काढण्यात येणार आहे. धोकादायक अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार तपासणी मोहीम राबवली.

- **आयुष प्रसाद,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

---

# लोणावळा : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी

## पर्यटकांना करावा लागला मोठ्या प्रमाणात कोंडीचा सामना

।लोणावळा।महाईन्यूज

**दोन दिवसांच्या सुट्ट्यांचा आनंद घेतल्यानंतर मुंबईकर पर्यटक पुन्हा मोठ्या संख्येने माघारी निघाल्याने मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर खंडाळा घाटात रविवारी प्रचंड वाहतूक कोंडी झाली. गेल्या काही दिवसांपासून शनिवार-रविवार आणि सलग सुट्ट्यांच्या कालावधीत मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर प्रचंड मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन सात ते आठ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा जाऊ लागल्या आहेत.**



त्यामुळे सुट्टीचे नियोजन करून पर्यटनासाठी निघालेल्या पर्यटकांना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो आहे. शुक्रवार आणि शनिवारी पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर, तर रविवारी मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर ही वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. पुण्याकडे जाणाऱ्या मार्गिकेवर शुक्रवार आणि शनिवारी होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी खंडाळा बोगद्याजवळ काही काळाचे ब्लॉक घेत सर्व वाहने सहाही मार्गिका खुल्या करत सोडण्यात येतात. त्यामुळे मुंबईच्या दिशेला जाणाऱ्या मार्गिकेवरही वाहतूक कोंडी होते. तर, रविवारी सर्व वाहने परतीच्या मार्गावर असल्याने मुंबई मार्गिकेवर वाहतूक कोंडी होत आहे. रविवारी संपूर्ण घाट परिसरामध्ये वाहतूक कोंडी झाल्याने दोन्ही मार्गिकांवरील वाहन चालकांना या कोंडीचा सामना करावा लागला.

### घाट परिसरात वाहतुकीचा वेग मंदावला

**» खंडाळा व बोरघाट महामार्ग पोलीस ही कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करत आहेत.यासाठी अवजड वाहनांची वाहतूक काही काळ थांबविण्यात आली होती. मात्र वाहनांची संख्या जास्त असल्याने घाट परिसरात वाहतुकीचा वेग मंदावला आहे.**

# उंड्री रोडवर भीषण अपघात; बसचा ब्रेक फेल, कारसह अनेक वाहनांना धडक, दोन ठार

। पुणे । महाईन्यूज ।

बसचा ब्रेक फेल झाल्याने शहरात भीषण अपघात झाला आहे. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. तर तीन जण गंभीर जखमी असल्याची प्राथमिक माहिती आहे. पुणे शहरात एन आय बी एम उंड्री रोडवर हा अपघात झाला आहे. एन आय बी एम उंड्री रोडवर उताराला एका बसचा ब्रेक फेल झाला. या बसने दुचाकी, रिक्षा आणि बीएमडब्ल्यू कारसह अनेक वाहनांना धडक दिली. यामुळे भीषण अपघात झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. तर तीन गंभीर जखमी झाले आहेत.

कोंढवा परिसरातील एनआयबीएम रोड परिसरात हा अपघात झाला. अचानक ब्रेक फेल झाल्याने समोर असलेल्या वाहनांना धडक दिली आहे. अपघातात एक रिक्षा, टेम्पो, दोन कार, एक दुचाकी, एक चारचाकी या वाहनांना बसने धडक दिली. जखमींना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,कोंढवा परिसरातील असणाऱ्या एनआयबीएम रस्त्यावर आज सायंकाळच्या सुमारास खासगी बस चालली होती. मात्र पुढे जात असताना या बसचा अचानक ब्रेक फेल झाला. त्यामुळे या बसने समोर असणाऱ्या वाहनांना जोरात धडक दिली. त्यामुळे वाहने एकमेकांना अचानकपणे जोरात धडकली. आणि एकमेकांवर जोरात आदळली. या अपघातात दोघांचा जागेवरच मृत्यू झाला. अन्य चार जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातामुळे रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

# वारकऱ्यांना सुविधा मिळणार!

## जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख: पालखी मार्गाची केली पाहणी

| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी हवेली तसेच पुरंदर तालुक्यातून जाणाऱ्या पुणे-सासवड-जेजुरी-नीरा या पालखीमार्गाला व पालखी तळ, विसाव्यांच्या ठिकाणांना भेटी देऊन तेथील तयारीच्या अनुषंगाने आढावा घेतला. वारकऱ्यांना कोणत्याही असुविधांना तोंड द्यावे लागू नये याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. पालखीमार्गावर आरोग्य सुविधा, पुरेसा औषध साठा, फिरत्या शौचालयांची व्यवस्था, पाणी, वीज आदी सर्व सुविधा प्राधान्याने पुरवण्यात याव्यात. दरवर्षीपेक्षा एक महिना अगोदर पालखीचे प्रस्थान होणार असल्याने उन्हाचा त्रास वारकरी भाविकांना होऊ नये यासाठी आवश्यक त्या औषधांची व्यवस्था ठेवावी, पुरेसे पिण्याचे पाण्याचा पुरवठा करण्यास प्राधान्य द्या, असे निर्देश डॉ. देशमुख यांनी यावेळी दिले.**



यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक अंकित गोयल, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, हवेलीचे प्रांताधिकारी संजय आसवले, दौण्ड- पुरंदर उपविभागीय अधिकारी मिनाज मुल्ला, श्री संत ज्ञानदेव महाराज देवस्थान आळंदीचे पदाधिकारी, हवेलीचे तहसीलदार किरण सुरवसे, राष्ट्रीय महामार्गचे कार्यकारी अभियंता अभिजित औटी आदी उपस्थित होते.

पालखीमार्गाच्या साईडपट्टया भरुन घेण्यासह खड्डे तसेच पाणी साचणाऱ्या ठिकाणी मुरूम व अन्य पर्यायांचा वापर करुन डागडुजी करावी. पालखी विसावा, मुक्काम असलेल्या गावातील पिण्याच्या पाणी योजनांसाठी अतिरिक्त राखीव पंप ठेवावेत. टँकर वाढवावेत. ऐनवेळी तांत्रिक अडचणी येऊ नयेत म्हणून पर्यायी व्यवस्था तयार ठेवावी. मार्गात आवश्यक तेथे पाण्याच्या टाक्या ठेवाव्यात. दिवे घाटाचा टप्पा पार केल्यानंतर झेंडेवाडी विसाव्याच्या ठिकाणी वारकऱ्यांना मोठा विसावा घ्यावा लागतो. त्या ठिकाणी वारकऱ्यांना विसावा घेता यावा यासाठी पुरेशी जागा उपलब्ध व्हावी म्हणून प्रशासनाने शेजारील खासगी जमीनधारकांशी संपर्क साधून व्यवस्था करावी.

### घाटामध्ये कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई

दिवे घाटामध्ये कचरा टाकण्यात येत असल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने घाटामध्ये गस्त घालण्यात यावी. असे प्रकार आढळून आल्यास कठोर कारवाई करण्यात यावी, असे निर्देशही डॉ. देशमुख यांनी दिले.

सासवड पालखीतळाची उंची वाढवण्याचे काम झाल्यामुळे पावसाचे पाणी साठण्याच्या अडचणीवर मात करणे शक्य झाले आहे. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी वीजपुरवठा सुरळीत राहील याकडे लक्ष द्या. पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटर ठेवावेत, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले. कऱ्हा नदीवरील पुलाच्या कामालाही जिल्हाधिकाऱ्यांनी भेट देऊन कामाला गती देण्याचा सूचना दिल्या. कोणत्याही परिस्थिती पुलाचे काम पूर्ण करून पालखी पुलावरून जाईल असे नियोजन सुरू असल्याचेही डॉ. देशमुख म्हणाले. जेजुरी पालखीतळाच्या सीमाभिंतीच्या कामाची पाहणी करून हे काम वेळेत पूर्ण करा अशा सूचना त्यांनी दिल्या. डॉ.देशमुख यांनी सासवड जवळील बोरावके मळा विसावा, वाल्हे पालखीतळ, नीरा पालखी विसावा स्थळ पाहणीदेखील केली . नीरा नदीवरील पुलाच्या संरक्षक कठड्यांची दुरुस्ती तत्काळ करून घ्या असेही डॉ. देशमुख म्हणाले.

---

# सट्टेबाज टोळीवर हिंजवडी येथे कारवाई!

## आयपीएल सामन्यांवर सट्टा घेणाऱ्या सहा जणांना अटक

| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**आयपीएल क्रिकेट सामन्यांवर सट्टा खेळणाऱ्या एका टोळीचा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाने पर्दाफाश केला आहे. नऊ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यातील सहा जणांना अटक केली आहे. आरोपींकडून चार लाख 81 हजार 200 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई मारुंजी रोड हिंजवडी येथे करण्यात आली.**



वैभव बाबाराम डिक्कर (वय 28, रा. अकोला), सचिन गंगाराम आजगे (वय 23, रा . धुळे), विकास कैलास लेंढे (वय 22, रा. राहु पिपळगांव पो. कोरेगाव ता. दौड, जि. पुणे), ओमकार बिरा भांड (वय 20, रा. राहु पिपळगांव पो. कोरेगाव, ता. दौड, जि. पुणे), आशिष निरांजण देशमुख (वय 28, रा. अकोला), महेश परमेश्वर काळे (वय 33, रा. अकोला) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

### या पोलीस पथकाने केली कारवाई

ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह आयुक्त डॉ. संजय शिंदे, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त स्वप्ना गोरे, सहाय्यक आयुक्त प्रशांत अमृतकर यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक प्रदीपसिंग सिसोदे, विजय कांबळे, पोलीस अंमलदार सुनील शिरसाट, गणेश कारोटे, वैष्णवी गावडे, तांत्रिक विश्लेषण विभागाचे पोलीस अंमलदार नागेश माळी यांच्या पथकाने केली आहे.

त्यांच्यासह राम भानुशाली, विकास रायसिंग चव्हाण, प्रकाश भगवानदास तेजवाणी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मारुंजी रोड हिंजवडी येथे एका सोसायटीमध्ये काहीजण कोलकाता नाईट रायडर्स लखनऊ सुपर जॉइंट्स आयपीएल क्रिकेट मॅच वर ऑनलाईन पद्धतीने सट्टा घेत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाला मिळाली त्यानुसार पोलिसांनी सापळा लावून सहा जणांना ताब्यात घेतले त्यांच्याकडून दोन लॅपटॉप, तेरा मोबाईल फोन, एक वाय फाय, चार नोटबुक असा एकूण चार लाख 81 हजार दोनशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# कर्नाटकची भाकरी करपणार का?



भाष्य

नितीन सावंत
91 9892514124



अखेर कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदाची माळ सिद्धरामय्या यांच्या गळ्यात पडली आहे. नेहमीप्रमाणे काँग्रेसने प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांना डावलून सिद्धरामय्या यांच्यावर मुख्यमंत्रीपदाची धुरा सोपवली आहे. राजस्थान मध्ये सचिन पायलट यांचा असाच वापर केला आणि मुख्यमंत्रीपदाची वेळ आली तेव्हा गेहलोत यांना काँग्रेसने राजस्थानचे मुख्यमंत्रीपद दिले. निवडणुकीच्या दीड वर्ष आधी सचिन पायलट यांना प्रदेशाध्यक्षपद देऊन त्यांना राज्यभर फिरवले. काँग्रेसचा परंपरागत मतदार आणि गुर्जर समाज ठामपणे पाहिलं त्यांच्या पाठीशी उभा राहिला. राजस्थानच्या मतदारांनी सचिन पायलट यांच्यासाठी कौल दिला होता मात्र गेहलोत हे निष्ठावान ठरले. सचिन पायलट यांची उपमुख्यमंत्री पदी वर्णी लावली. पुढे पायलट यांनी बंडाचा झेंडा फडकवला. मात्र प्रियंका गांधी यांनी सचिन पायलट यांची समजूत काढली. त्यामुळे त्यांचे बंड शमले. बंड होऊन सुमारे दोन वर्षे उलटली तरी पायलट यांना पुन्हा मंत्रिमंडळात घेतलेले नाही. राजस्थान निवडणुकीला काही महिने शिल्लक असतानाच सचिन पायलट यांनी पुन्हा मुख्यमंत्री गेहलोत यांच्या विरोधात शड्डू ठोकले आहेत. कर्नाटक मध्ये असाच प्रकार घडला आहे डी के शिवकुमार यांचा वापर काँग्रेस पक्षाने करून घेतला आणि मुख्यमंत्रीपदाची माळ सिद्धरामय्या यांच्या गळ्यात टाकली. कर्नाटक मध्ये लिंगायत आणि वोक्कलिगा हे दोन समाज कर्नाटकचा मुख्यमंत्री ठरवतात. भाजपचे माजी मुख्यमंत्री येडियुरप्पा यांना लिंगायत समाजात सन्मान आहे. नुकतेच पायउतार झालेले कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई हे लिंगायत समाजाचे असले तरी येडियुरप्पा यांना कर्नाटकात लिंगायत समाजात मोठा मान आहे. त्यांना बाजूला करून त्यांच्या मुलाला भाजपने तिकीट दिले तरीसुद्धा कर्नाटकच्या लिंगायत समाजाने भाजपच्या बाजूने मतदान केले नाही. कर्नाटकचा लिंगायत समाज येडियुरप्पा यांच्याशिवाय कोणालाही आपला नेता मानण्यास तयार नाही. येडियुरप्पा याना डावलल्याचा फटका भाजपला तीन निवडणुकांमध्ये बसला. तरीसुद्धा भाजपचे केंद्रीय नेतृत्व धडा घेण्यास तयार नाही. वोक्कालिगा समाजाचे वर्चस्व लिंगायत समाजाच्या खालोखाल आहे. माजी पंतप्रधान देवेगौडा याच समाजाचे आहेत. देशभर जनता दल संपले असताना या समाजाच्या जीवावर देवेगौडा यांनी आपल्या पक्षाचे अस्तित्व ठेवले आहे. कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि देवेगौडा यांचे पुत्र कुमार स्वामी यांना या समाजाच्या जीवावरच मुख्यमंत्रीपद मिळाले होते. कर्नाटक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डी के शिवकुमार हे सुद्धा वोक्कालिका समाजाचे आहे. काँग्रेस पक्ष मुख्यमंत्री पद शिवकुमार यांना देईल या आशेने वोक्कलीगा समाजाने आपली मते यावेळी काँग्रेसच्या पारड्यात टाकली. त्याचा फटका देवेगौडा यांच्या पक्षाला बसलाच परंतु भाजपला मोठ्या प्रमाणात बसला. देवेगौडा यांच्या पक्षाची जी पाच टक्के मते कमी झाली ती थेट डी के.शिवकुमार यांच्यामुळे काँग्रेसच्या पारड्यात पडली. आज शपथ घेणारे काँग्रेसचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या हे कुरबा समाजाचे आहेत. कुरुबा म्हणजे धनगर समाज. 2003 साली कुमारस्वामी यांना कंटाळून सिद्धरामय्या जनता दल सेक्युलर मधून काँग्रेसमध्ये दाखल झाले. नंतर काँग्रेसने त्यांना मुख्यमंत्रीपद दिले. लिंगायत समाजाला पर्याय म्हणून छोट्या जातीसमूहांचे संघटन करून त्यांनी या समाजाना काँग्रेसच्या जवळ आणले. या निवडणुकीत लिंगायत समाजाला विशेष दर्जा देण्याची मागणी याच सिद्धरामय्या यांनी केली होती. त्याचा फायदा फारसा झाला नाही मात्र आपले नेते येडियुरप्पा यांना भाजप डावलत आहे हे या समाजाच्या लक्षात आल्याने त्यांनी भाजप विरोधात मतदान केले. मात्र डी के शिवकुमार या धाडसी नेत्याला डावलल्याचा परिणाम काँग्रेसला लोकसभा निवडणुकीत भोगावे लागणार आहेत.आता झालेल्या विधानसभा निवडणुकीतील मतदान पाहिले असता काँग्रेस 21 लोकसभा मतदार संघात आघाडीवर आहे तर भाजप पाच लोकसभा मतदार संघात आघाडीवर आहे. डी के शिवकुमार यांची लोकप्रियता पाहून भाजपने त्यांना फार त्रास दिला. ईडीने त्याना अटकही केली होती. शंभर दिवस तुरुंगात काढल्यानंतर शिवकुमार यांची सुटका झाली होती. भाजपची ऑफर धुडकावून आपल्या पक्षाशी एकनिष्ठ राहिलेल्या डीके शिवकुमार यांना संधी मिळायला हवी होती असे कर्नाटकच्या जनतेचे म्हणणे होते. परंतु काँग्रेसने भाकरी फिरवलीच नाही. ही न फिरवलेली भाकरी करपण्याची शक्यता मोठी आहे. आमदारांमध्येही डी के शिवकुमार हेच लोकप्रिय होते. त्यांना मुख्यमंत्री करावे अशी आमदारांची मागणी होती परंतु आमदारांच्या मागणीला केराची टोपली दाखवून काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींनी सिद्धरामय्या यांना पुन्हा संधी दिली आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख कर्नाटकचे निरीक्षक होते. त्यावेळी आमदारांचे म्हणणे ऐकून घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. एस.एम. कृष्णा आणि धरम सिंग या दोन नेत्यांमध्ये मुख्यमंत्री पदाची चुरस होती. बहुसंख्य आमदारानी एस एम कृष्णा यांना मुख्यमंत्री पद द्यावे अशी शिफारस विलासरावांकडे केली होती. विलासरावानी आमदारांचे म्हणणे पक्षश्रेष्ठींच्या कानावर घातले. त्यानंतर पक्षश्रेष्ठींचा निरोप आला की धरम सिंग यांना काँग्रेसचे विधिमंडळ नेते म्हणून जाहीर करा.

## संपादकीय »

### आपची भाजपवर मात!

***भाजप दिल्लीवर ताबा ठेवण्यासाठी केंद्र सरकारची सारी यंत्रणा वापरत आहे, हे निवडणूक प्रचारापासून ताज्या वटहुकमापर्यंत अनेकदा दिसले...***

भाजप दिल्लीवर ताबा ठेवण्यासाठी केंद्र सरकारची सारी यंत्रणा वापरत आहे, हे निवडणूक प्रचारापासून ताज्या वटहुकमापर्यंत अनेकदा दिसले. पण लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्या 'तिहेरी जबाबदारीच्या साखळीचे तत्त्व' घटनापीठाला अभिप्रेत होते, ते 'आप'ला तरी मान्य आहे का? अन्य पक्षांकडून 'आप'ला निव्वळ शाब्दिक पाठिंबाच का मिळतो आहे?दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे महत्त्वाकांक्षी राजकारणी आहेत, त्यांना दिल्ली ताब्यात ठेवायची आहे. केजरीवाल यांनी विधानसभा निवडणुकीत भाजपला धोबीपछाड दिली, महापालिका निवडणुकीत भाजपने जंगजंग पछाडले; पण तिथेही आम आदमी पक्षाचा पराभव करता आला नाही. निवडणुकांमध्ये 'आप'ने भाजपवर मात केल्याने केंद्रातील सत्ताधारी पक्ष वैफल्यग्रस्त होणे अगदीच स्वाभाविक होते. चोवीस तास निवडणुकीच्या मूडमध्ये असलेल्या भाजपच्या नेत्यांना पराभव सहन होत नाही.

**कर्नाटकात काँग्रेसला विजय मिळणार, असे बहुतेक जनमत चाचण्या सांगत होत्या. काँग्रेसलाही विजयाचा अंदाज आल्यानंतर, शेवटच्या टप्प्यातील प्रचाराची रूपरेषा आखण्याबरोबरच विजयाच्या श्रेयाची नीटस कुंडलीही मांडण्यात आली.भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनाही शेवटच्या काही दिवसांत पराभव दिसू लागला होता.**

## कर्नाटकी कशिदा...




या पराभवाचा तडाखा थोडा कमी व्हावा, यासाठीच बजरंगबलीची गदा हातात घेण्याचा प्रयत्न झाला. इतक्या स्पष्ट विजयाची अपेक्षा असताना आणि तसेच निकाल लागूनही काँग्रेस पक्षाला नेतृत्वाचा निर्णय तातडीने घेता येऊ नये, याचा अर्थ इतिहासातील चुकांमधून शिकण्याची पक्षाची आजही तयारी नाही. खरे तर, काँग्रेसचे सध्याचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे गृहराज्य कर्नाटकच आहे. तेथील राजकारण त्यांना माहीत आहे. याशिवाय, निकाल लागल्यानंतर काँग्रेस श्रेष्ठींनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यासहित तीन केंद्रीय निरीक्षकही बेंगळुरू येथे पाठविले होते. या निरीक्षकांनी आमदारांशी केवळ चर्चाच केली नाही, तर गुप्तपणे चिठ्ठ्या टाकून सर्व निर्वाचित आमदारांचा कलही आजमावण्यात आला. एवढे होऊनही नेतृत्वनिर्णयाचे त्रांगडे पुन्हा दिल्लीत जावे, चर्चेच्या अनेक फेऱ्या व्हाव्यात, रात्री-अपरात्री वयस्कर नेत्यांना जाग्रण व्हावे आणि शेवटी सिद्धरामय्या हे मुख्यमंत्री आणि प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार हे उपमुख्यमंत्री हा फॉर्म्युला निश्चित व्हावा, ही प्रक्रिया कोणत्या लोकशाही पक्षाला शोभून दिसते? नव्या मुख्यमंत्र्यांची निवड बेंगळुरूमध्येच आणि आमदारांच्या बैठकीत उघडपणे किंवा गुप्त मतदानाने व्हायला हवी होती. हा प्रश्न दिल्लीत नेण्याचे आणि अनेक नेत्यांची विमाने तिकडे वळविण्याचे कारणच काय? ज्या नेत्याला जास्त आमदार प्राधान्य देतील, तो नवा मुख्यमंत्री बनेल, इतका साधा नियम किंवा संकेत काँग्रेसला इतक्या वर्षांमध्ये का रुळवता येऊ नये? आता काँग्रेसच्या पक्षसंघटनेच्या औपचारिक उतरंडीत गांधी कुटुंब कुठेही नाही. या कुटुंबाचे पक्षातील स्थान कोणीही अमान्य करणार नाही; तरीही नेतृत्वाचा तिढा शेवटी सोनिया गांधी यांनी सोडविला, अशा बातम्या येत असतील, तर नवनिर्वाचित विधीमंडळ पक्ष आणि आमदारांचा कल व कौल याला काय अर्थ राहिला? कर्नाटकाचे नवे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचा जन्म १९४७चा असून, ते ऑगस्टमध्ये वयाची ७५ वर्षे पुरी करतील. सन १९६२ मध्ये जन्मलेले शिवकुमार हे तुलनेने बरेच तरुण आहेत. सिद्धरामय्या यांना पहिली दोन वर्षे पद सांभाळू दे आणि नंतर नेतृत्वबदल करून पुढची तीन वर्षे शिवकुमार यांच्याकडे हे पद जावे, असा तोडगा काढण्यात आल्याचे सांगण्यात येते. मात्र, राजकारणात भविष्यातील भरवशावर कुणी विश्वास ठेवत नाही. ते शक्यही नसते. ही नेतानिवडीची धांदल चालू असतानाच, डी. के. शिवकुमार यांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर बेहिशेबी मालमत्तेचा खटला आला आणि त्याची सुनावणी 'सीबीआय'च्या विनंतीनुसार १४ जुलै रोजी ठेवण्यात आली, या बातमीकडे अनेकांचे लक्ष गेले असेलच.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# केंद्रातील सरकार बनिया वृत्तीचे!

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची पंतप्रधान मोदींवर जहरी टीका

**। धाराशिव।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आश्वासने देऊन नागिरकांना मोठी स्वप्ने दाखवितात. दिलेली आश्वासने ते कधीच पूर्ण करीत नाहीत. त्यांच्यासारखा खोटारडा माणूस पाहिला नाही, अशी जहरी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.नाना पटोले यांनी एका कार्यक्रमात बोलत होते. त्यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली.**



पटोले म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांसाठी युनिफॉर्म तयार करणार असे म्हणाले होते. त्यानंतर त्यांनी देशातील संरक्षण विभागाचेच खासगीकरण केले. चीनने आपल्या देशावर कब्जा केला, मात्र देशातील ५६ इंचची छातीचे नेतृत्व यावर बोलताना दिसत नाहीत.मी पंतप्रधान मोदी यांच्या सारखा खोटारडा माणूस नाही."

महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांचाही पटोले यांनी यावेळी समाचार घेतला. नाना पटोले म्हणाले, "सध्या जगाच्या पाठीवर दिसणारे भारतातील कॉम्पुटर इंजिनियर ही राजीव गांधी यांची देण आहे. आताच्या पंतप्रधानांनी महाराष्ट्राच्या राज्यपाल पदावर एका काळ्या टोपीवाल्याला बसवले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, सावित्रीबाई फुले यांचा वारंवार अपमान केला."

केंद्रातील सरकार बनिया वृत्तीचे असल्याची टीकाही पटोले यांनी केली. ते म्हणाले, "सध्या देशभरात कृत्रिम महागाई सुरू आहे. लोकांना गरीब करून गुलाम करण्यासाठी ही भाजपची नीती आहे. केंद्रातील भाजप सरकार हे बनिया वृत्तीचे आहे." यानंतर त्यांनी नाव न घेताल औरंगाबाचे खासदार इम्तियाज जलिल यांचाही समाचार घेतला.

### आघाडी पुन्हा आवळणार 'वज्रमूठ'



**» कर्नाटक निवडणुकीतील विजयानंतर महाविकास आघाडीला पुन्हा बळ मिळाले आहे. महाविकास आघाडीच्या थांबलेल्या 'वज्रमूठ' सभा आता पुन्हा होणार आहेत. पुण्यात आघाडीची सभा होणार आहे. त्या सभेची तारीखही ठरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या राजीनाम्यानंतर आघाडीच्या सभांवर परिणाम झाला होता. मात्र, आता पवार यांनी राजीनामा मागे घेतला आहे. तसचे कर्नाटमध्ये काँग्रेसला ऐतिहासिक विजय मिळाला. त्यामुळे देशभरात विरोधी पक्षांना उर्जा मिळाली आहे. महाविकास आघाडीमध्येही काही मतभेद झाल्याची चर्चा होती. मात्र, ते मतभेद विसरुन आता पुन्हा एकदा आघाडी आपली 'वज्रमूठ' आवळणार आहे. काही दिवसांपूर्वीच शरद पवार यांच्या निवासस्थानी उद्धव ठाकरे यांच्यासह आघाडीच्या नेत्यांची बैठक झाली होती. त्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेमध्ये बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे (NCP) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितले होते की "उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन स्थगित करण्यात आलेली महाविकास आघाडीची 'वज्रमूठ' सभा पुन्हा एकदा सुरू करणार असल्याची चर्चा बैठकीत करण्यात आली."**

---

## नवउद्योजकांना ५५० कोटींचे अनुदान; युवकांनी रोजगार देणारे बनावे : उदय सामंत

**। नवी दिल्ली।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

युवकांनी रोजगार शोधण्यापेक्षा रोजगार देणारे बनावे. यासाठी राज्य शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यात येणार आहे. गेल्या 10 महिन्यात उद्योग विभागाने या योजनेच्या माध्यमातून 13 हजार उद्योजक उभे केले आहे. तसेच उद्योगांसाठी या काळात 550 कोटींचे अनुदान दिले आहे. यंदाच्या वर्षी किमान 25 हजार उद्योजक उभे करण्याचे उद्दीष्ट आहे, अशी माहिती राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

जिल्हा उद्योग केंद्र व खासदार उदयनराजे भोसलेमित्र परिवारामार्फत यशोदा टेक्नीकल कॅम्पस येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई SHAMBHURAJ DESAI, खासदार उदयनराजे भोसले, रणजितसिंह नाईक निंबाळकर, जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी, पोलीस अधीक्षक समीर शेख, उद्योग विभागाचे सहसंचालक सदाशिव सुरवसे, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक उमेशचंद्र दंडगव्हाळ, यशोदा टेक्नीकलचे संस्थापक अध्यक्ष दशरथ सगरे उपस्थित होते.

सामान्य कुटुंबातील युवकांना रोजगाराची संधी मिळवून देण्यासाठी या भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन केल्याचे सांगून उद्योगमंत्री श्री. सामंत म्हणाले, तरुणाईच्या हाताला रोजगार देणे ही सर्वांची जबाबदारी आहे. जास्तीत जास्त रोजगार निर्मिती करण्याचे उद्दीष्ट शासनाने ठेवले आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम गावांगावांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. गेल्या 10 महिन्यात उद्योग विभागाने या योजनेच्या माध्यमातून 13 हजार उद्योजक उभे केले आहे. तसेच उद्योगांसाठी या काळात 550 कोटींचे अनुदान दिले आहे. यंदाच्या वर्षी किमान 25 हजार उद्योजक उभे करण्याचे उद्दीष्ट आहे.

## ...तोवर विधानसभा निवडणूक लढणार नाही!

### जम्मू-काश्मीरच्या महबुबा मुफ्ती मोदी सरकारविरोधात आक्रमक

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**जवळपास चार वर्षांपूर्वी म्हणजेच २०१९ मध्ये जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारं कलम ३७० केंद्र सरकारने हटवलं. यावरून काश्मीरमधील अनेक पक्ष तसेच पीडीपी पक्ष केंद्र सरकारचा सातत्याने विरोध करत आहेत. पीडीपी नेत्या आणि जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री महबुबा मुफ्ती यांनी पुन्हा एकदा यावरून केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे.**





### भाजप कुणालाही सोडणार नाही

**»भारतीय जनता पार्टी कोणत्याही विरोधी पक्षाला सोडणार नाही. विरोधी पक्षांचं सरकार ते हायजॅक करत नाहीत किंवा त्यांचे आमदार खरेदी करणार नाहीत तोवर ते थांबणार नाहीत.**

मुफ्ती म्हणाल्या काश्मीर खोऱ्यात कलम ३७० लागू होत नाही तोवर मी निवडणूक लढणार नाही. कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या निकालाचा उल्लेख करत महबुबा मुफ्ती म्हणाल्या कर्नाटकने दाखवून दिलंय की यांच्या (सत्ताधाऱ्यांच्या) संस्थांच्या ताकदीपेक्षा (ईडी-सीबीआय) लोकांची ताकद अधिक असते. बंगळुरूत एका कार्यक्रमात महबुबा मुफ्ती म्हणाल्या ९० च्या दशकाच्या सुरुवातीला मी येथे एक वर्षापेक्षा अधिक काळ राहिले आहे. गेल्या पाच वर्षाय येथे (कर्नाटकात) द्वेष आणि लोकांना फोडण्याचं राजकारण केलं गेलं. त्यामुळे देशाच्या धर्मनिरपेक्षतेला मोठा फटका बसला आहे. मला खात्री आहे, सिद्धरामय्या आणि त्यांचं सरकार या जखमा भरून काढेल.

महबुबा मुफ्ती म्हणाल्या, 'आम्ही जम्मू-काश्मीरचे लोक या फॅसिस्ट शक्तींचा पहिला बळी ठरलो. आमच्या राज्यात मुस्लीम बहुसंख्य असूनही भारताच्या विचारसरणीचा आम्ही अवलंब केला. आम्हाला वाटत होतं आमच्या जीवाचं रक्षण होईल. आमचं राज्य भारतीय राष्ट्रवादाचा आत्मा होतं. परंतु २०१९ पासून आम्ही त्या अधिकारांपासून वंचित आहोत. काश्मीरमधील समस्या वाढल्या आहेत. आपण विचित्र टप्प्यातून जातोय, याची कल्पना अनेकांना नाही. मुफ्ती म्हणाल्या की, सुरक्षेच्या नावाखाली काश्मीरमध्ये सर्च ऑपरेशन सुरू आहे. ईडी आणि इतर संस्था अशा प्रकारचे सर्च ऑपरेशन राबवत आहेत आणि त्याद्वारे सामान्य नागरिकांना त्रास देत आहेत.

दिल्लीतल्या लोकांना जागं करावं लागेल. भाजप देशाची घटना मोडत असल्याचा आरोप करत पीडीपी अध्यक्षा मेहबुबा मुफ्ती यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. काश्मीरचे अफगाणिस्तानात रूपांतर झाले आहे. भाजपने बहुमताला शस्त्र बनवले आहे. अतिक्रमणविरोधी मोहिमेचा एक भाग म्हणून जम्मू आणि काश्मीरमधील गरीब आणि उपेक्षितांची घरे पाडण्यासाठी बुलडोझरचा वापर केला जात आहे.

# रश्मिका मंदानाला फटका

गेल्या काही वर्षात अनेक दाक्षिणात्य कलाकारांनी बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं आहे. दक्षिणात्य चित्रपटांप्रमाणेच हिंदी चित्रपटातही आपल्या दमदार अभिनयाची छाप पाडत त्यांनी संपूर्ण देशाला वेड लावलं. यामध्ये काहींना यश आलं तर काहींना अपयश आलं. त्यातलीच एक अभिनेत्री म्हणजे रश्मिका मंदाना. बॉलिवूडमधील तिचा पहिला चित्रपट अपयशी ठरल्याने दुसऱ्या चित्रपटाच्या बाबतीत तिला मोठा फटका बसला आहे.

रश्मिकाने या वर्षाच्या सुरुवातीला 'पुष्पा' या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांना भुरळ घातली. दक्षिणात्य चित्रपटसृष्टीत लोकप्रियता मिळवल्यावर यावर्षी तिने बॉलिवूडमध्ये पाऊल टाकलं. अमिताभ बच्चन यांची प्रमुख भूमिका असणाऱ्या 'गुडबाय' या चित्रपटातून तिने बॉलिवूडमध्ये एन्ट्री केली. परंतु हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करू शकला नाही. याचाच परिणाम म्हणून तिच्या पुढच्या बॉलिवूड चित्रपटाच्या बाबतीत त्यांनी मोठा निर्णय घेतला आहे. लवकरच रश्मिका 'मिशन मजनू' या बॉलिवूड चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. तर तिच्याबरोबर अभिनेता सिद्धार्थ मल्होत्राही मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाच्या घोषणेपासूनच याची तिच्या चाहत्यांमध्ये चर्चा होती. आधी हा चित्रपट मोठ्या पडद्यावर प्रदर्शित करण्याचा निर्मात्यांचा विचार होता. मात्र रश्मिका च्या पहिल्या बॉलिवूड चित्रपटाला मिळालेला प्रतिसाद बघून आता यात बदल केला गेला आहे. मिशन मजनू' हा रश्मिकाचा आगामी चित्रपट चित्रपटगृहात नाही तर थेट ओटीटीवर प्रदर्शित करण्याचा निर्णय निर्मात्यांनी घेतला आहे. या चित्रपटाच्या निर्मात्यांनी 'नेटफ्लिक्स'ची करार करून 'मिशन मजनू' हा चित्रपट ते 'नेटफ्लिक्स'वर प्रदर्शित करणार आहेत. हा चित्रपट ओटीटी वरून प्रेक्षकांच्या भेटीला येईल.





# कोण आहे जान्हवीचा मिस्ट्री बॉय?

बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर नेहमीच चर्चेत असते. जान्हवी तिच्या फॅशन सेन्समुळे नाही तर तिच्या व्हॅकेशनमुळे देखील लॅमलाईटमध्ये असते. पण आता चर्चा होत आहे ती वेगळीच, आतापर्यंत जान्हवीचे नाव अनेक प्रसिद्ध व्यक्तींसोबत जोडले गेले आहे. पण जान्हवी तिच्या नात्याबद्दल कधीच उघडपणे बोलली नाही. सध्या जान्हवीचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे ज्यामध्ये ती तिच्या मिस्ट्री बॉयचा हात धरुन पार्टीत एन्ट्री करताना दिसत आहे. जसा हा व्हिडीओ समोर आला तसं जान्हवीच्या रिलेशनशीपच्या चर्चा रंगलेली पहायला मिळाली

जान्हवी कपूरने नुकतीच एका पुरस्कार सोहळ्याला हजेरी लावली होती. पण या अवॉर्ड नाईटमध्ये जान्हवी एकटी नाही तर तिचा खास मित्र ओरहान अवत्रामणीसोबत पोहोचली होती. जान्हवीने ओरहानसोबत पापाराझींनाही अनेक पोझ दिल्या. एवढेच नाही तर जान्हवी ओरहानचा हात धरत सोहळ्यात एन्ट्री करताना दिसली. जान्हवीची ओरहानसोबत खास बाँडिंग पाहून हे दोघे एकमेकांच्या डेट करत आहे की काय? असा सवाल आता सर्व करू लागलेयत.

# 'बेशरम रंग' चित्रपटासाठीचं मानधन चर्चेत...



बॉलिवूडवरिल बॉयकॉटचं सावट कमी झाल आहे असं वाटतं असतांनाचं शाहरुख खानच्या 'पठाण' चित्रपटाने पुन्हा बॉयकॉटच्या ट्रेंड जोर धरु लागला आहे. काही दिवसांपुर्वी या चित्रपटाचा टिझर रिलिज झाला आणि आता या चित्रपटातील पहिलं गाणं बेशरम रंग हे रिलीज होतात गाण्याला जोरदार विरोध होतं आहे. त्या गाणयातील दिपिकाचे कपडे त्याचा रंग आणि तिची डान्स स्टेप यावरुन जोरदार राडा सुरु आहे.

जेव्हा चित्रपटाचं पोस्टर रिलिज झालं तेव्हा बॉलीवूडमधील सर्वात लोकप्रिय जोडी शाहरुख खान आणि दीपिका पदुकोण यांची पुन्हा केमेस्ट्री पहायला मिळणार होती. त्यामूळे हा चित्रपट हिट होणार असं वाटलं होतं मात्र या गाण्याला होणारा विरोध आणि बॉयकॉट ट्रेंड यामूळे चित्रपटाच्या कलेक्शनवर याचा परिणाम दिसणार आहे. निर्माता आदित्य चोप्राने 'पठाण'च्या बजेटवर पैसे खर्च करण्यात कोणतीही कसर सोडली नाही. 'पठाण' ची स्टारकास्ट आणि दिग्दर्शकाची फी तुम्हाला आश्चर्यचकित करेल. त्यातच चित्रपटासाठी कलाकारांचं मानधन हा सध्या सर्वाधिक चर्चेचा विषय आहे. 'पठाण या हाय- ॲक्शन थ्रिलर चित्रपटासाठी चित्रपट निर्मात्याला 6 कोटी रुपये मानधन मिळाल्याची माहिती आहे.

चित्रपटात मुख्य भूमिकेत असलेल्या शाहरुख खानला या चित्रपटासाठी भरघोस मानधन मिळत असल्याची माहिती आहे. या चित्रपटासाठी, शाहरुखला मानधन म्हणून 100 कोटी रुपये दिले जातात आणि तो नफ्यातही त्याचा हिस्सा घेत असतो. KoiMoi मधील एका अहवालानुसार, शाहरुख खानला 'पठाण मधील त्याच्या मुख्य भूमिकेसाठी 100 कोटी रुपये मानधन देण्यात आले आहे, ज्यामुळे तो सध्या देशातील सर्वाधिक मानधन घेतलेल्या अभिनेत्यांपैकी एक बनला आहे.

# हे पाहण्यासाठी लक्ष्मीकांत असायला हवा होता... अशोक मामांना सतत वाटतेय त्या गोष्टीची खंत

चित्रपटांतून एकत्र काम करणारे काही मराठी कलाकार फक्त सहकलाकारच नव्हे, तर एकमेकांचे जिगरी दोस्तही आहेत. ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ आणि दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांची ही मैत्री अशीच होती. ८० आणि ९० च्या दशकातला काळ अशोक सराफ, सचिन पिळगावकर, महेश कोठारे आणि लक्ष्मीकांत बेर्डे या चौकडींनं गाजवला. त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीला वेगळी ओळख दिली. त्यापैकी लक्ष्मीकांत बेर्डे आज आपल्यामध्ये नसले, तरी या तिघांची मैत्री आजही घट्ट आहे. मराठी चित्रपटात लक्ष्मीकांत बेर्डे आणि अशोक सराफ या जोडीनं धम्माल केली. मराठी सिनेमाचा एक काळ गाजवला. पण 'लक्ष्या'चं निधन झालं आणि प्रेक्षकांची लाडकी जोडी तुटली. काही महिन्यांपूर्वी एका



वाहिनीवर लक्ष्याबद्दल बोलताना, त्याच्या आठवणींना उजाळा देताना अभिनेता अशोक सराफ भावूक झाले होते. त्यांच्या डोळ्यात पाणी आलं होतं. एका खास भागासाठी अशोक सराफ या कार्यक्रमात सहभागी झाले होते. त्यावेळी त्यांनी लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या स्मृतींना उजाळा दिला होता.

**काय म्हणाले होते अशोक सराफ?**

'अरे येड्या. लवकर गेलास. तुझ्यासारख्या माणसाची मराठी चित्रपटसृष्टीला अजूनही गरज होती. तुझ्यासारखा मेहनत करणारा माणूस आजही हवा होता. कुठं तरी शुन्यातून विश्व निर्माण करणारा. साहित्य संघात तात्या आमोणकरांच्या मागे बॅग घेऊन फिरणारा. नोकरी करताना मी तुला बघितलय. पण ती ओळख परत कधीच कुणाला तू होऊ दिली नाहीस. साहित्य संघात जेव्हा मी एकांकिका करत होतो तेव्हा मधल्या जागेत मांडी घालून बसणारा तुझ्यातला माणूस मी पाहिला आहे. नट म्हणून मी तुझी कामे पाहिली होती. पण तू या कामात इतका आत घूसशील असे मला कधीच वाटले नव्हते. तू स्वतः:ची अशी एक वेगळी ओळख निर्माण केलीस की, मी लक्ष्मीकांत बेर्डे आहे हे लक्षात ठेवा' असं अशोक सराफ यांनी म्हटलं होतं.

लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासंदर्भातील अनेक बाबींची माहिती त्यांनी यावेळी दिली होती. तसंच आपल्याला आजही लोक लक्ष्मीकांत बेर्डे आणि तुमची जोडी भन्नाटच होती, असं आवर्जुन सांगतात असंही सराफ यांनी म्हटलं होतं. आजही लोक त्याचं नाव काढतात, हे पाहण्यासाठी लक्ष्मीकांत असायला हवा होता. त्यानं त्याचं नावलौकिक अजूनही कायम ठेवलं आहे याचा अभिमान वाटतो, असंही ते म्हणाले होते.

# मुंबईला विराट कोहली भिडला!

## शुभमन गिल मदतीला आला, आरसीबी पुन्हा एकदा प्ले ऑफपासून वंचित

| बेंगळुरू |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**आयपीएलच्या प्लेऑफमध्ये जाण्याचं आरसीबीचं स्वप्न अखेर भंगलं आहे. शुभमन गिल याची शतकी खेळी विराटच्या शतकी खेळीवर भारी पडली. आरसीबी आयपीएलमधून बाहेर गेली. यामुळे आरसीबीला मोठा झटका बसला.**






आयपीएलच्या प्लेऑफमध्ये सर्वप्रथम धडकलेल्या गुजरात टायटन्सने आज आरसीबीला जबरदस्त धक्का दिला. गुजरातच्या शुभमन गिलने तुफानी शतकी खेळी करत आरसीबी आणि विराट कोहलीच्या स्वप्नांवर पाणी फेरलं. शुभमन गिलच्या फलंदाजीने मुंबई इंडियन्सला प्लेऑफची लॉटरी लागली. मुंबई प्लेऑफमध्ये गेली. यामुळे आरसीबीचा पराभव झाल्याचा सर्वाधिक आनंद हा मुंबई इंडियन्सला आणि मुंबईच्या चाहत्यांना झाला असेल.

गुजरातविरोधात आरसीबीने प्रथम फलंदाजी करत १९८ धावांचं लक्ष्य ठेवलं. यात विराट कोहलीचं धडाकेबाज शतकही होतं. सामन्यात विराट मैदानात उतरलाच मोठ्या खेळीच्या इराद्याने. विराटने शतकी खेळी केलीही. विराटने या सामन्यात ३५ चेंडूत अर्धशतक तर ६० चेंडूत शतक झळकवलं. विराट या सामन्यातही नाबाद राहिला. विराटला फाफ डु प्लेसिस आणि मॅक्सेल यांनी साथ दिली. विराटने फलंदाजीवेळी आरसीबीची एक बाजू लावून धरली. आरसीबीची धावसंख्या २०० च्या जवळ नेऊन ठेवली. विराटने १३ चौकार आणि १ षटकार लगावला. आरसीबीने विराटच्या शतकाच्या जोरावर ५ गडी गमवत १९७ धावा केल्या.

### यंदाच्या स्पर्धेत

**आरसीबी मोठ्या आत्मविश्वासाने मैदानात उतरली होती. फलंदाजीनंतर गुजरातविरोधात फिल्डींग आणि गोलंदाजीही चांगली केली. पण शुभमन गिलही मुंबई इंडियन्सला प्लेऑफमध्ये पोहोचवण्यासाठीच मैदानात उतरला, असंच वाटत होतं. शुभमन गिल यांनी तडाखेबाज फलंदाजी केली. शुभमन गिल याने ५२ चेंडूत शतक झळकावलं. शुभमन गिलच्या या शतकाच्या जोरावर गुजरातने तगडा संघ असलेल्या आरसीबीवर विजय मिळवला. विराटने सलग दोन सामन्यात शतक झळकवलं. तर शुभमन गिलने आयपीएलमधलं दुसरं शतक केलं. गिलने ५२ चेंडूत ५ चौकार आणि ८ षटकांसह शतक झळकावलं. गुजरातला ६ गडी राखून विजय मिळवून दिला. सामन्यात विराट कोहली आणि शुभमन गिल हे दोन्ही चांगले खेळले. पण या सामन्यातील पराभवामुळे आरसीबी बाहेर गेली. यामुळे आयपीएलमधील प्लेऑफमध्ये जाण्याचा आणि आयपीएल जिंकण्याचं आरसीबीचं आणि विराट कोहलीचं स्वप्न भंगलं.**

### प्लेऑफमध्ये कोणते संघ गेले?

**गुजरात जायंट्स, चेन्नई सुपर किंग्ज, मुंबई इंडियन्स आणि लखनौ सुपर जायंट्स हे चार संघ प्लेऑफमध्ये दाखल झाले आहेत.**

# महिला कुस्तीगिरांचे २८ मे रोजी नव्या संसद भवनासमोर आंदोलन

| नवी दिल्ली|
महाईन्यूज | प्रतिनिधी|

भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात आंदोलन करत असलेल्या महिला कुस्तीगिरांची नव्या संसद भवनासमोर पंचायत घेण्यात येणार आहे. नव्या संसद भवनाचे २८ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, खाप महापंचायतने आंदोलनासाठी हाच दिवस आणि हेच केंद्र निश्चित केले आहे.

खाप महापंचायतीचाच आधार घेत कुस्तीगिरांनी ब्रिजभूषण यांना अटक करण्यासाठी २१ मेपर्यंतची मुदत दिली होती. या मुदतीनंतर खाप महापंचायतीचे पदाधिकारी जो निर्णय घेतील तो आमच्यासाठी अंतिम असेल, असे स्पष्ट केले होते. रविवारी सायंकाळी खाप पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांची रोहतक येथे बैठक पार पडली. या बैठकीत आंदोलन नव्या संसद भवनासमोर नेण्याचे निश्चित करण्यात आले. या बैठकीला कुस्तीगीर साक्षी मलिक, तिचा पती सत्यव्रत कडियान उपस्थित होते. बजरंग पुनिया व विनेश फोगट जंतरमंतर येथेच थांबले होते. बजरंगने खाप पंचायतीच्या निर्णयाचे स्वागत केले. आता महिला कुस्तीगिरांना पुरुष कुस्तीगिरांचा पाठिबा राहणार की नाही, याचा निर्णय पुढे घेण्यात येईल, असे पुनिया म्हणाला. दरम्यान, भारतीय ऑलिम्पिक समितीने नियुक्ती केलेली हंगामी समिती २० जून रोजी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी चाचणी घेणार आहे. आता यासाठी कुस्तीगिरांकडे सरावासाठी पुरेसा वेळ नाही. त्यामुळे आंदोलनातील सहभागी कुस्तीगिरांची भूमिका काय राहणार हा प्रश्न नव्याने उपस्थित राहिला आहे.




# बुमरा, पंतच्या अनुपस्थितीचा भारतीय संघाला फटका!

## 'डब्ल्यूटीसी' अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाचे पारडे जड; इयन चॅपल यांचे मत

| नवी दिल्ली|
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**उत्कृष्ट वेगवान गोलंदाजांच्या फळीमुळे आगामी जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या (डब्ल्यूटीसी) अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाचे पारडे जड असेल, असे मत ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार इयन चॅपल यांनी व्यक्त केले.**

उत्कृष्ट वेगवान गोलंदाजांच्या फळीमुळे आगामी जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या (डब्ल्यूटीसी) अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाचे पारडे जड असेल, असे मत ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार इयन चॅपल यांनी व्यक्त केले. तसेच जायबंदी जसप्रीत बुमरा आणि ऋषभ पंत यांच्या अनुपस्थितीचा भारताला मोठा फटका बसेल, असेही चॅपल यांना वाटते.

'डब्ल्यूटीसी'चा अंतिम सामना ७ ते ११ जून या कालावधीत इंग्लंडमधील ओव्हल मैदानावर खेळवला जाणार आहे. पंत, बुमरा यांच्यासह श्रेयस अय्यर आणि केएल राहुल हे भारतीय खेळाडूही दुखापतींमुळे या सामन्याला मुकणार आहेत. "बुमरा आणि पंत यांच्या अनुपस्थितीचा भारताला मोठा फटका बसेल. हे दोघे उपलब्ध असल्यास भारतीय संघाचे सामन्यात पारडे जड असते. तसेच अष्टपैलू हार्दिक पंड्या कसोटी क्रिकेट खेळत नसल्याचे मला आश्चर्य वाटते. त्याच्यासारख्या खेळाडूचा भारताला नक्कीच फायदा झाला असता," असे चॅपल यांनी नमूद केले.

ऑस्ट्रेलियाकडे पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क आणि जोश हेझलवूड हे उत्कृष्ट वेगवान गोलंदाजांचे त्रिकूट आहे. त्यामुळे या सामन्यात ऑस्ट्रेलियाचे पारडे जड असेल. ते कोणत्याही परिस्थितीत चांगली गोलंदाजी करू शकतात, पण जून महिन्याच्या सुरुवातीला इंग्लंडमध्ये वेगवान गोलंदाजांना अधिकच मदत मिळते. याचा त्यांना नक्कीच फायदा होईल. भारताकडेही उत्तम गोलंदाज आहेत. त्यामुळे दोन्ही संघांमधील फलंदाजांना धावा करण्यासाठी झुंजावे लागेल.

कमी धावा केल्या आणि जर त्यांनी ९७ धावांनी विजय साकारला तरच ते दुसऱ्या स्थानावर जाऊ शकत होते.

